सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.९ मधील सुंदर पार्क ते वृंदावन कॉलनी मयुर हाडको ते आरवाडे पार्क या संपूर्ण परिसरास कोतवले मळा असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.संगिता विठ्ठल खोत यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील किल्ला भाग मिरज आदर्श शिक्षण मंदिर येथील सार्वजनिक रिक्षा थांबा असून, सदर रिक्षा थांब्यास कै.पै.जोतीराम (दादा) खोत रिक्षा थांबा असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.उमेश विलास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली माधवनगर रोड येथील स.नं.१७०/अ/१ येथील महानगरपालिकेच्या जागेमध्ये महापालिकेच्या वतीने बांधकाम करण्यात आलेल्या १४ गाळ्यांना कै.मा.खासदार प्रकाशबापू पाटील शॉपिंग कॉम्प्लेक्स असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या कु.सोनाली विलास सागरे व श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड प्रभाग क्र.८ मधील स.नं.१० क्षेत्र २४.६१ आर १०० फुटी डीपी रोड लगत असणाऱ्या मनपा मालकीच्या खुल्या जागेवर उद्यान व चिल्ड्रन पार्क विकसीत करणेचे नियोजीत असून, सदर नियोजित उद्यान व चिल्ड्रन पार्कला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील सत्यसाई नगर येथे दक्षिणोत्तर चालीच्या गल्ल्या आहेत. सदर गल्ल्यांना गल्ली नंबर १,२ व ३ असे नंबर देवून, त्याप्रमाणे नंबरच्या पाट्या उभा करुन मिळणेस तेथील नागरीकांची मागणी आहे. पत्रव्यवहारासाठी व नागरीकांच्या संपर्काच्या दृष्टीने सदर गल्ल्यांना १,२ व ३ असे गल्ली नंबर देवून, नंबरच्या पाट्या लावणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.विष्णू माने

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कोल्हापुर रोड आकाशवाणी ते काळीवाट ५० फुटी पुर्व-पश्चिम रस्त्यास वीर शिवा काशिद मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या विविध रस्ते व चौकास नामकरण करणेबाबत अंतिम मान्यतेसाठी नगरसचिव विभागाकडे दि.१४/०८/२०२३ रोजी विषयपत्रे दाखल झालेली असून, सदर विषयपत्रातील शिफारशीनुसार खालील प्रमाणे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

१. सांगली वॉर्ड क्र.१० मधील मनपाच्या मालकीच्या जागेवर अमृत २.० या योजनेतून उद्यान विकसीत करणेत आले असून, सदर उद्यानास माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
२. सांगली कोल्हापूर रोड वरील विष्णू आण्णा फळ मार्केट ते एस.टी.स्टॅण्ड येथील शास्त्री चौका पर्यतच्या रस्त्यास स्व.मदनभाऊ पाटील मार्ग असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
३. महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग येथील सांगली अर्बन बँक, विश्रामबाग ते जयहिंद कॉलनी डॉ.केदारी प्रसाद कुलकर्णी मधील चौकास गो.चि.कानिटकर चौक असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
४. सांगली वॉर्ड क्र.१० मधील वरद हॉस्पिटल ते मुळीक जाधव वखारी पर्यतच्या परिसरात मुयर कॉलनी रिसालदार मळा असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
५. सांगली वॉर्ड क्र.१४ मधील कोटणीस महाराज मार्गावरील बापट बाल विद्यामंदिर येथील चौकास बृहत त्रयीरत्न वैद्यराज आ.वा.दातारशास्त्री चौक असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
६. मनपा प्रभाग क्र.१३ मधील मनपा शाळा क्र.१६ येथे नव्याने विकसीत होत असलेल्या अभ्यासिकेस मा.स्व.पतंगरावजी कदम अभ्यासिका असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
७. सांगली वॉर्ड क्र.१४ मधील प्रशिक चौक ते हरिपुर रोड काळीवाट पर्यतच्या रस्त्यास परमार्थ निकेतन मार्ग असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
८. सांगली माधवनगर रोड (सांगली पुणे-बायपास रोड) चौकास आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक चौक असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.
९. मनपा क्षेत्रातील वॉर्ड क्र.१३ मधील सांगलीवाडी येथील सांगली इस्लामपूर रोडच्या उत्तरेस असलेल्या निसर्ग प्लाझा अपार्टमेंट परिसर व दक्षिणोत्तर रस्त्यास छत्रपती शिवाजीनगर असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. जगन्नाथ ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने

D. P. Suryavanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ ऑक्सिडेशन पॉड येथे नागरिकांच्या मनोरंजन तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी बगीचा तयार करण्यात आला आहे. सदर बगीचाला कै.रामचंद्र विठ्ठल भोसले उद्यान असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- डी. गजानन आलदर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- डी. संतोष पाटील

D. P. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० येथील महानगरपालिकेने घोषित केलेल्या खाऊ गल्लीस हिंदु हृदयसम्राट कै.बाळासाहेब ठाकरे खाऊ गल्ली असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.जगन्नाथ ठोकळे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.२६८ मधील नैसर्गिक नाल्याच्या दोन्ही बाजूला मनपा मालकीच्या विना वापर जागा असून, सदर जागेचे संरक्षण तसेच निसर्गाचे संवर्धन होण्यासाठी तसेच नाल्याचा मुळ प्रवाह नष्ट होवू नये यासाठी सदर जागेमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन सदर गार्डनला बुद्ध गार्डन असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. जगन्नाथ ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D. P. Suryavanshi
महापौर,

मा. उपमहापौर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अजिंक्य दिनकर पाटील,सौ.भारती हेमंत दिगडे,सौ.उर्मिला उदय बेलवलकर, श्री.पै.सुबराव नागाप्पा मद्रासी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी येथील रॉयल कृष्णा बोट क्लब या संस्थेचे महापुराच्या संकटावेळी केलेले कार्य हे बहुमुल्य व अतुलनीय असे आहे. रॉयल कृष्णा बोट क्लब या संस्थेस सांगली येथील शाळा नं.५ वापरणेस दिल्यास महाराष्ट्रातील अद्यावत आपत्ती व्यवस्थापन व वॉटर स्पोर्टस केंद्र सांगली येथे तयार होईल. याबाबत सदर संस्थेकडून सदर शाळा वापरणेस मिळणेबाबत मागणी केलेली असून, सदरची शाळा वापरणेस देणेबाबत ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील गावभाग येथील संकल्प फाऊंडेशन, विसावा मंडळ, विश्वसेवा फाऊंडेशन, तपोवन मंडळ या मंडळांना होडी व आपत्कालीन साधने ठेवण्यासाठी मागणी केलेनुसार मनपा शाळा नं.५ मधील जागा कायमस्वरुपी वापरास देणेबाबत ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.अपर्णा बजरंग कदम यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी येथील तरुण मराठा बोट क्लब सांगलीवाडी यांनी बोटी व साधन सामुग्री ठेवण्यासाठी मागणी केलेनुसार मनपा शाळा नं.१६ ही शाळा वापरास देणेबाबत ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

महापालिका सचिव सूचक

:- (जाधव/पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या ~~सौ.~~ सौ.अस्मिता संदीप सलगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांमध्ये सुरु असलेल्या बालवाडीमधील बालवाडी सेविका यांना मानधन वाढ करणेसाठी १(ज) प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्या अनुषंगाने महासभा ठराव क्र.५८७ दि.२०/०७/२०२३ अन्वये बालवाडी सेविकांना अदा करणेत येत असलेल्या मानधनाबाबतचा अहवाल सादर करणेस आदेशित केलेनुसार प्रशासन अधिकारी,शिक्षण मंडळ मनपा यांचेकडून अहवाल सादर करणेत आलेला आहे. त्या अनुषंगाने नगरसचिव विभागाकडे विषयपत्र दि.१०/०८/२०२३ रोजी सादर करणेत आले आहे. त्यानुसार सदरचा अहवाल अवलोकनी घेवून बालवाडी सेविकांना प्रतिमहा र.रु.१०,०००/- मात्र मानधन आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने

अनुमोदक :- श्री. जगन्नाथ ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

प्रशासकीय (शिक्षण विभाग)

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संजय नारायण यमगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१२ मधील जुना बुधगाव रोड,लक्ष्मीनगर,दडगे प्लॉट,शिवोदयनगर सांगली येथील जुना स.नं.१०८/२ पैकी असून, खुली जागा/ओपन स्पेस हा मनपा मालकीचा आहे. सदर प्लॉट मधील सर्व प्लॉट हे बिनशेती असून त्यांचे रेखांकन मंजूर आहे. सदर खुली जागा/ओपन स्पेस मध्ये श्री.सदगुरु संत बाळुमामा मंदिर आहे. सदर मंदिर हे परिसरातील नागरिकांचे श्रद्धास्थान आहे, या मंदिराची देखभाल,पुजा अर्चा,स्वच्छता व मंदिराचे पावित्र्य ठेवणेसाठी श्री,सदगुरु संत बाळुमामा प्रतिष्ठान,लक्ष्मीनगर सांगली हे विना मोबदला नि:शुल्क सांभाळणेस तयार असलेने, सदरची जागा देणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [signature] (जगन्नाथ ठोकळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री. संतोष पाटील

[signature] D P Suryavanshi
महापौर,

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१८,१४,१७,१५,१९ पैकी काही भाग सांगली शहर पोलिस ठाणे व व विश्रामबाग पोलिस ठाणे अंतर्गत येत असहे. सदरचा भाग विस्तारीत व संवेदनशील असून, दोन्ही पोलिस ठाणे या भागापासून फारच दुर आहेत. सदर संवेदनशील भागात कायदा व सुव्यवस्था राखणेच्या दृष्टीकोनातून सदर भागात पोलिस ठाणे कार्यालय निर्माण करण्याकरीता मा.शासनाकडे मागणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [illegible] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [illegible] नगरसेवक संतोष पाटील

D.P. Suryavanshi
महापौर,

[illegible]

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील गणेशनगर रोड नं.०६ गारपीर चौक जवळील सार्वजनिक पुरुष स्वच्छतागृह खराब झाले असलेने ते पाडून नविन स्वच्छतागृह बांधणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D P. Suryavarshi

महापौर,

सहा. आयुक्त प्र.स.क्र.१

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील स.नं.७५९५ ते २०००२ यामध्ये गेली १०० वर्षापुर्वी पासून रहिवाशी पक्की बांधकाम करुन वास्तवास आहेत. सदर मिळकीवर आरक्षण क्र.६० नुसार प्रायमरी स्कुलचे आरक्षण आहे. सदरची सर्व मिळकती अनेक वर्षापासून सातत्याने रहिवाशी म्हणून राहत असल्याने त्यांच्या मागणी अनेक वर्षापासून आरक्षण उठवून बांधकाम परवाने अदा करणेकामी होती. त्यानुसार ३० (१) नुसार आरक्षण रद्द होवून रहिवाशी विभागात समाविष्ठ झाल होते. त्यानंतर प्रशासनाने पाठपुरावा करुन रहिवाशी यांच्या मागणीचा विचार करुन या भागातील महापालिकेची अन्य खाजगी शाळा असल्याने आता या आरक्षणाची आवश्यकता नव्हती हे प्रशासनाने यापुर्वी नोंद घेवूनच रहिवाशी मध्ये समाविष्ठ करणेकामी कार्यवाही केलेली होती. ही वस्तुस्थिती विचारात घेवून मा शासनास सदरचे आरक्षण रद्द करुन रहिवाशी विभागात समाविष्ठ करणेकामी प्रस्ताव पाठवून मान्यता प्राप्त करुन या आधारे रहिवाशी यांना बांधकाम परवाने देणेच्या निर्णयासाठी ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- (रागनाथ ठोकडे)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने

D.P. Suryavash
महापौर,

स.स.नं.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४७

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मधील इनामधामणी परिसरालगत असलेल्या जुना स.नं.३३८,३७०,३७१,३७२,३७३ व ३३५ (स.नं.७५,८५,८६,८७,८८) या मिळकती मधून जाणाऱ्या आणि १०० फुटी रस्ता ते इनामधामणी रस्ता यांना जोडणाऱ्या नियोजीत २४.४० मी.रुंदीचा विकास योजना रस्ता या भागातील नागरिकांच्या मिळकती या बिनशेती झालेल्या असून,त्या मिळकतीवर नागरिकांनी आपली घरे,बंगले तसेच अर्पाटमेंट बांधलेल्या आहेत. या सर्व इमारतीमहानगरपालिकेमार्फत नियमानुसार घरपट्टी व पाणीपट्टी रितसर लावणेत आली असून, त्यानुसार ते सर्व नागरिक नियमितपणे महापालिकेस कर भरणा करत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणचे नागरिक व मा.सदस्यांच्या मागणीनुसार आणि जागेवरील सद्यस्थितीच्या विकासानुसार सदरचा २४.४० मी.रुंदीचा रस्ता रद्द करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ (१) नुसार विकास योजना नकाशात बदल करणेसाठी मा.महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.अपर्णा बजरंग कदम यांनी दिलेली उपसूचना सर्वानमुते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी स.नं.४/अ/४ व २७६/१ व २७६/२ या जागेवर शॉपिंग सेंटर व भाजी मंडई (व्हेजीटेबल मार्केट) चे आरक्षण ठेवण्यात आले आहे. परंतु सदर ठिकाणी नागरिकांना पक्की घरे बांधलेली असलेने त्यांना घरपट्टी पाणीपट्टी लागू करणेत आलेली असून, ते नियमीतपणे कर भरणा करत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या नागरिकांचेकडून आरक्षण उठविणेबाबत वारंवार मागणी होत आहे. यासाठी सदर ठिकाणचे आरक्षण उठवून सदर जागेचा रहिवाशी विभागात समावेश करणेसाठी अधिनियमातील कलम ३७(१) अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस व मा.शासन मान्यतेच्या अधीन राहून गुंठेवारी अधिनियम २००१च्या कलम ५(१) व ५(२)नुसार सदर गुंठेवारी नियमितीकरणा करुन नागरीकांना गुंठेवारी प्रमाणपत्रे देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील D.P.Suryavanshi महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव

सां. मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४८

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.गजानन रामू मगदुम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.२९/४क यामध्ये महापालिकेच्या नगररचना विभाग,कुपवाड यांचेकडून गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव बेकायदेशीररित्या मंजूर करणेत आलेला असून, सदर जमिनीस कोणतीही पोहोच रस्ते उपलब्ध नाहीत. तसेच दर्शविण्यात आलेल्या प्लॉटच्या समोरील रस्ते हे शेजारील स.नं.मधून बेकायदेशिररित्या दाखविण्यात आलेले आहेत ही बाब अत्यंत गंभीर असून, सदर स.नं.२९/४क मधील प्लॉट विक्री मध्ये नागरीकांची फसवणुक होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदरचे प्रस्ताव तपासून त्याबाबत प्रशासनाने योग्यती कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D.P. Suryavanshi
महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६४९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड नाला नंबर १,२,३ पैकी ३ नंबरची जागा ४२ व्यक्तीनी १९७५ मध्ये नोंदणीकृत खरेदी घेतलेली आहे. नंबर १ व ३ या जागेवर गणपती पंचायतन संस्थेचे नाव ७/१२ उताऱ्यावर आज अखेर नाव आहे. परंतु सदर जागेवर १९४२ पासून आजअखेर १०० हुन अधिक झोपडपट्टी सलग ८१ वर्षे येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी शौचालय,नळपाणी कनेक्शन व लाईट या सुविधा बरोबरच अंतर्गत रस्ते व इतर नागरी सुविधा मनपाने उपलब्ध केलेल्या आहे त्यामुळे सदरच झोपडपट्टी शासनाने अधिकृत झोपडपट्टी म्हणून जाहिर करणेस ही सभा शिफारस करीत आहे.

सूचक :- (जगन्नाथ ठोकळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संतोष पाटील

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६५०

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रातील मालमत्ता धारकांवर शास्तीची कारवाई करु नये असा महासभा ठराव क्र.७८ दि.१९/११/२००८ रोजी झाला असून, त्यास मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली असून, गुंठेवारी क्षेत्रातील नागरिकांची घरपट्टी आकारणी दंडात्मक कारवाईनेच सुरु आहे ही बाब अन्यायकारक असल्याने सदरचा सन २००८ रोजी पारित झालेला ठराव आहे तसा कायम करुन,गुंठेवारी क्षेत्रातील नागरिकांवर शास्तीच्या माध्यमातून सुरु असलेला आर्थिक अन्याय थांबविणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (जगन्नाथ-ठोकळे)

अनुमोदक :- श्री.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६५१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१० अ मधील राजर्षी शाहू कॉलनी (नविन वसाहत) मधील बुद्ध विहाराच्या देखभाल संरक्षण व धार्मिक कामासाठी श्री.सुशांत कांबळे, श्री.राकेश कांबळे, श्री.संदिप माने, श्री.हरिभाऊ सवणे, श्री.दिलीप गाडे, श्री.संभाजी शिवशरण, श्री.विनोद जगधने, श्री.राहुल शिंदे, श्री.प्रफुल्ल ठोकळे, श्री.यशराज रणखांबे, श्री.अभिजीत गाडे, श्री.ऋषीकेश बनसोडे, श्री.आनंद चवडीकर, अमिता कांबळे, मोना वाघमारे, छाया कांबळे, रेषमा कांबळे, सारंग कांबळे, अशिष बाबर, नितिन कांबळे, मयुर आठवले, सावन खरात, बापू कांबळे, शरद शिंदे, राकेश गाडे या २५ व्यक्तींची समिती स्थापन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.योंगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या प्रभाग क्र.२० मधील श्रावणी पार्क येथील महापालिकेच्या वतीने बौद्ध विहार व ग्रंथालय इमारत उभा रहात असून, सदर बौद्ध विहार व ग्रंथालयाचे पावित्र राखणे व संरक्षणाच्या दृष्टीने व देखभालीसाठी दि बुद्धीष्ठ सोसायटी ऑफ इंडिया अंतर्गत भारतीय बौद्ध महासभा मिरज श्रावणी पार्क शाखा यांनी मा.आयुक्तसो यांचेकडे मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर संस्थेस बौद्ध विहार व ग्रंथालय इमारत देखभालीसाठी देणेसाठी मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वतीने सांगली येथील स्टेशन चौक येथे महापालिकेच्या जुन्या घरपट्टी ऑफिस शेजारी लोकनेते राजाराम बापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेत येणार असून, सदर पुतळ्यासाठी खालील प्रमाणे पुतळा स्वागत समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१. मा.दिग्विजय सूर्यवंशी - अध्यक्ष
२. मा.मैनुद्दीन बागवान - सदस्य
३. मा.विष्णू माने - सदस्य
४. मा.युवराज बावडेकर - सदस्य
५. मा.शेडजी मोहिते - सदस्य
६. मा.संतोष पाटील - सदस्य
७. श्री.शंभूराज काटकर - सदस्य
८. श्री.सुरेश बंडगर - सदस्य

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री.विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील D/ SURYAVANSHI महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६५२

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वे स्टेशन समोर रिक्षा स्टॉपला मान्यता मिळणेबाबत या भागातील नागरिकांची व रिक्षाचालकांची अनेक दिवसापासून मागणी होत आहे. यासाठी सदर ठिकाणी रिक्षा स्टॉप बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.जगन्नाथ ठोकळे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील

D.P.Suryavanshi
महापौर,

सहा.आयुक्त क्र.५ व ६

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका